**क्रमांक : ६८७३ /ई-१**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

विधान भवन, मुंबई

दिनांक : २१ जून, २०२४

**: परिपत्रक :**

**विषय:** **महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक २१ जून, २०२४ रोजी समाप्त झालेल्या मा. सदस्यांकडून आगामी सत्राकरिता प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबत.**

महाराष्ट्र विधानपरिषदेतील सर्वश्री नरेंद्र दराडे, रामदास आंबटकर, विप्लव बाजोरिया, प्रविण पोटे-पाटील, सुरेश धस या सदस्यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक २१ जून, २०२४ रोजी समाप्त झाली आहे. सन २०२४ च्या आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशनाकरिता सदर सन्माननीय सदस्यांपैकी श्री.रामदास आंबटकर यांचेकडून पहिल्या टप्प्यातील व श्री.सुरेश धस यांचेकडून पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचना प्राप्त झाल्या होत्या.

श्री.रामदास आंबटकर, वि.प.स. व श्री.सुरेश धस, वि.प.स. यांच्या सदस्यत्वाची मुदत समाप्त झाली असल्याने त्यांचेकडून पहिल्या टप्प्यातील प्राप्त झालेल्या तसेच श्री. सुरेश धस, वि.प.स. यांचेकडून दुसऱ्या टप्प्यातील स्वत:च्या नावाने स्वतंत्ररित्या प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांवरील कार्यवाही आहे त्या स्तरावर थांबविण्यात येऊन उक्त सूचना व्यपगत केल्या आहेत. तसेच श्री. सुरेश धस, वि.प.स. यांचेकडून दुसऱ्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचनांमध्ये इतर विद्यमान सदस्यांची नावे अनुमोदक म्हणून असल्यास सदर प्रश्न सूचना व्यपगत न करता पुढील विद्यमान सदस्यांच्या नावे दाखविण्यात आल्या आहेत व इतर विद्यमान सदस्यांच्या प्रश्नांस अनुमोदक म्हणून श्री. रामदास आंबटकर, वि.प.स व श्री. सुरेश धस, वि.प.स. यांचे नाव असल्यास सदर प्रश्न सूचनेतून त्यांचे नाव वगळण्यात आले आहे.

राजेश तारवी

**(राजेश तारवी)**

उप सचिव

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रती:**

(१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव

(२) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव

(३) मा. मंत्री यांचे खाजगी सचिव

(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.